मा. न्यायालय प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड    **P.S.(ठाणे):** हदगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0400    **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/11/2025 02:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार    **Date From (दिनांक पासून):** 22/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2025
**Time From (वेळेपासून):** 13:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/11/2025    **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/11/2025 02:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय हदगाव ,हदगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रिती पिता रमेश जाधव

(b) **Father's Name** (वडील चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि नांदेड ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि नांदेड ,नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8381040809

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुमन संभाजी कहाळे | | | 1. यशवंत नगर ,हदगाव ,हदगांव, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गोविंद अप्पाराव जाधव | | वडील का नाम : अप्पाराव | 1. उमरी जहांगीर ,हदगाव ,हदगांव, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5700 | 5,700.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,700.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 23/11/2025
मी प्रिती पिता रमेश जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 83810 41809
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील दोन वर्षापसून पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) म्हणून कार्यरत आहे.
आम्ही दि. 20/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार यशवंत संभाजी नरवाडे, वय 63 वर्षे, व्यवसाय रेशन दुकानदार, रा. वारकवाडी, ता. हदगाव, जि. नांदेड,यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.
त्यावरून आम्ही तक्रारदार श्री यशवंत नरवाडे यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, माझी वारकवाडी गावात रेशन दुकान असून त्याचा परवाना क्रमांक रास्तभाव दुकान क्रमांक 170 वारकवाडी ता. हदगाव जि. नांदेड असा आहे. मला प्रति क्विंटल 150 रूपये कमिशन शासनाकडून मिळत असते. मला माहे जुलै 2025 ते माहे ऑक्टोंबर 2025 या चार महिन्याचे 57000/- रूपये कमिशन म्हणून मिळाले आहेत. आता माझे रेशन दुकानात माहे नोव्हेंबर 2025 चे रेशन प्राप्त झाले आहे. परंतु पुरवठा निरीक्षक श्रीमती सुमन क-हाळे यांनी त्यांच्याकडून माझे रेशन ई पॉज मशिनमध्ये अपलोड केले नाही. त्यामुळे मला माहे नोव्हेंबर 2025 चे रेशन लाभार्थींना वाटप करता आलेले नाही. तसेच आमच्या गावातील ग्रामपंचायतने ठराव घेतला की, ज्या रेशन कार्डमध्ये फक्त दोनच माणसे आहेत असे एकुण 13 लाभार्थी व त्यांचे नाव अंत्योदय रेशन कार्डमधून कट करून त्यांना अन्न सुरक्षा योजनेमध्ये टाकावे. ज्यामध्ये प्रती माणुस 5 किलो रेशन मिळते आणि त्यांच्या अंत्योदय योजनेमध्ये गावातील गरीब व गरजु लोकांचे नाव त्यामध्ये समाविष्ट करावे आणि 14 लाभार्थी सरकारी नोकरीला असल्याने ते 14 लाभार्थी असे एकुण 27 जुने लाभार्थ्यांचे नाव कट करून नवीन लाभार्थ्यांचे नाव ऑनलाईन करणे आहे.
तरी तक्रारदार हे दि. 18/11/2025 रोजी तहसिल कार्यालय, हदगाव येथील पुरवठा विभागात पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे व त्यांचे कार्यालयातील कंत्राटी संगणक ऑपरेटर गोविंद जाधव यांना भेटले. त्यांनी पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे यांचे कक्षात दोघांनी माहे नोव्हेंबर 2025 चे रेशन ई पॉज मशिनवर अपलोड करण्यासाठी व 27 नवीन लाभार्थ्यांचे ऑनलाईन करून देण्यासाठी मला मिळालेले 57000/- रूपये कमिशनचे 20 टक्के रक्कम 11400/- रूपये मागितले आहेत.
तक्रारदार व पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे व कंत्राटी संगणक डेटा ऑपरेटर गोविंद जाधव यांच्यात पैश्याचा देण्याघेण्याचा कोणताही व्यवहार नसून वैर, दुश्मनी नसल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. तक्रारदार यांना सदरची रक्कम 11400/- रूपये ही लाच असल्याची खात्री झाल्याने त्यांना लाच देण्याची इच्छा नसून दि. 22/11/2025 रोजी तक्रारदार यशवंत नरवाडे हे तहसिल कार्यालय, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड येथे पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे व कंत्राटी संगणक डेटा ऑपरेटर गोविंद जाधव यांना भेटण्यास जाणार आहे. वगैरे प्रमाणे तक्रार दिली आहे.
आम्ही मा. पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांच्या तोंडी आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री साईप्रकाश चन्ना यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेले दोन शासकीय पंच 1) अमोल श्यामराव कोरडे, पद क्षेत्र कार्यकर्ता, दुरध्वनी विभाग, नेमणुक नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड 2) सुमित शंकरराव कापसे, पद लिपिक टंकलेखक, नेमणुक विभागीय भांडर शाखा, महाराष्ट्र राज्य परिवहन, नांदेड असे पंच उपलब्ध करून घेतले.



Scanned with CamScanner

दि. 22/11/2025 रोजी आम्ही खाजगी वाहन टोयोटो क्वालीस कार क्रमांक एमएच 18 टी 1111 मध्ये खाजगी इसम चालक श्री साईनाथ वामणे यांच्यासह आम्ही व दोन पंच व स्विफ्ट डिजायर कार क्रमांक एमएच 26 एके 1166 मध्ये चालक पोहेकॉ/गजानन राउत सोबत पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, पोहेकॉ/305 अरशद अहेमद खान व पोकॉ/186 सयद खदीर असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडचे कार्यालयातून 09.15 वाजता नांदेड येथून निघून हदगाव येथे 10.50 वाजता पोहोचून उमरखेड रोडवरील ग्रिन फिल्ड हॉटेलच्या शेजारी नियोजित निर्जनस्थळी जावून थांबलो. त्यानंतर थोड्या वेळात तक्रारदार हे त्याठिकाणी आले. दोन्ही पंचासमोर तक्रारदार यांनी परत तक्रारीचे तोंडी कथन केले. त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 20/11/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर आम्ही पंच, तक्रारदार असे सर्वानुमते लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहेकॉ/अरषद अहेमद खान यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर पोहकॉ/अरषद अहेमद खान यांनी आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

कंत्राटी संगणक डेटा ऑपरेटर गोविंद जाधव यांच्या ठिकाण्याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोबाईल 7820806502 या क्रमांकाचे मोबाईलवरून ऑपरेटर जाधव यांच्या मोबाईल क्रमांक 8600571303 वर वेळ 12.09 वाजता कॉल केला असता, त्यांनी मला तहसिल कार्यालय, हदगावला यायला अर्धा घंटा लागेल असे कळविले. त्यानंतर काही वेळ वाट पाहून परत त्यांना तक्रारदार यांचे मोबाईलवरून ऑपरेटर जाधव यांना त्यांचे मोबाईलवर 12.45 वाजता कॉल केला. तेव्हा त्यांचा फोन व्यस्त येत होता. त्यानंतर परत 12.47 वाजता कॉल केला असता, ऑपरेटर गोविंद जाधव यानी मी तहसिलला आली आहे असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लाच पडताळणी कारवाईसाठी पाठविण्याचा निर्णय घेवून आम्ही व सोबत पोहेकॉ/305 अरषद अहेमद खान यांना घेवून तक्रारदार व पंच क्र. 1 याना खाजगी वाहनात घेवून तहसिल कार्यालय, हदगाव जवळ जावून वेळ 13.04 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळ्यात लटकावुन देवून तक्रारदार व पंच क्र. 01 अमोल कोरडे यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय, हदगाव येथे रवाना केले.वेळ 13.59 वाजता तक्रारदार व पंच क्र. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे हे त्यांचे कार्यालयात हजर असल्याने मी व पंच क्र. 1 असे सरळ त्यांचे कक्षात जावून बोललो, तेव्हा त्यांनी सांगितले की, '' 20 टक्के कोण म्हटलं ओ तुम्हाला, 10 टक्के................,नोकरीवाल्यांचे व्हाईट करून टाकते....., ठिक आहे, तुमचे ते अंत्योदय 14 टाकायचे, त्याचे ते सर्व बरोबर दिले फाईल करून, सगळ्याचे आधार आहेत बरोबर...........तोंडातून शब्द कुठच काढायचा नाही, तुमच टाकलं की, दहा लोक माझेकडे येतील. माझेकडे इश्टांग नाही. तुमच इश्टांग कमी आला म्हणून तुमचेच लोक आम्ही घ्यायलोत, हे जर गोष्ट बाहेर पडली, तुमचं मुश्कील करल आणि माझाही मुश्कील करल............आता तुम्हाला एकदाच मी माफ केलं.........., मॅडम एक हजार रुपये घेतात, पण याच्यानंतर कुठ वस्स, वस्स करू नका, धमकी नाही देत आहे...................., कुठ जाणार आहेत, कोण करणार तुमचं काम..............., किती जमा झाले, ठिक आहे, हजार, दीड हजार रुपये कमी द्या'' असे म्हणून लाचेची मागणी केल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेविका सुमन क-हाळे व कंत्राटी ऑपरेटर गोविंद जाधव यांची भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरुन तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण एकच असल्याचे निष्पन्न झाले. तरी लोकसेवक सुमन क-हाळे व कंत्राटी ऑपरेटर गोविंद जाधव यांनी तक्रारदार यांचे माहे नोव्हेंबर 2025 चे रेशन पॉज मशीनवर टाकण्यासाठी व नवीन 27 लोकांचे रेशनकार्ड ऑनलाईन करण्यासाठी तक्रारदार यांना मागील चार महिन्याचे रेशनचे मिळालेले 57000/- रुपये कमिशनचे 20 टक्क्याची मागणी करून तडजोडी अंती 10 टक्के 5,700/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे ठरले.

तक्रारदार यांनी त्यांचे जवळील 5,700/- रुपये रक्कम (ज्यात पाचशे रुपये दराच्या 11 भारतीय चलनी नोटा व शंभर रुपये दराच्या 2 भारतीय चलना नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. पोकॉ/सयद खदीर यांनी लाच रक्कम 57,00/- रुपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन.तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या खिशात अलगद ठेवून दिले.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी त्यांचे गळ्यात 15.40 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर



Scanned with CamScanner

चालू करून गळयात अडकावून पंच क्र. 1 अमोल कोरडे यांच्यसोबत तहसिल कार्यालय, हदगाव येथे रवाना केले. त्यानंतर त्यांच्या पाठोपाठ आम्ही व सापळा पथक त्यांच्यावर नजर ठेवून त्यांच्या मागे मागे तहसिल कार्यालय, हदगाव येथे गेलो. त्यानंतर तक्रारदार हे 15.57 वाजता तहसिल कार्यालय, हदगाव ईमारतीच्या बाहेर आले व लोकसेवक यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ तहसिल कार्यालय, हदगावचे इमारतीतील पुरवठा विभागात गेलो असता, त्याठिकाणी लोकसेविका सुमन क-हाळे हे त्यांचे कक्षात खुर्चीवर बसलेले होते व त्यांचे समोरील कक्षात संगणक ऑपरेटर गोविंद जाधव हे पण त्यांचे कक्षात संगणकावर बसलेले होते व त्यांचे समोरील एच.पी. कंपनीचे ऑल ईन वन प्रिंटरचे कागदावरील सेफ्टी झाकनवर ठेवलेले दिसून आले. तेव्हा आम्ही त्यांना आमचा परिचय देवून त्यांच्यावर अँन्टी करप्शनची कारवाई झाल्याचे कळविले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांना कंत्राटी ऑपरेटर गोविंद जाधव यांच्या ताब्यातील प्रिंटरवर ठेवलेले अँन्थ्रॉसिन पावडरयुक्त 5700/- रूपये लाचेची रक्कम मिळून आल्याचे दाखवून ती हस्तगत केली. त्यानंतर लोकसेविका सुमन क-हाळे व कंत्राटी ऑपरेटर गोविंद जाधव यांना ताब्यात घेवुन सापळा पथकासह पोलीस स्टेशन हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड येथे हजर आलो.

तरी तक्रारदार यशवंत संभाजी नरवाडे, रा. वारकवाडी, ता. हदगाव, जि. नांदेड यांनी दिनांक 20/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथे तक्रार दिली होती. त्यावरून दिनांक 22/11/2025 रोजी 13.04 ते 13.59 वाजण्याचे दरम्यान तहसिल कार्यालय, हदगावचे पुरवठा विभागात शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. या कारवाई दरम्यान लोकसेविका सुमन संभाजी क-हाळे, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद निरीक्षण अधिकारी तथा नायब तहसिलदार नेमणुक तहसिल कार्यालय, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड व गोविंद अप्पाराव जाधव, व्यवसाय कंत्राटी संगणक डेटा ऑपरेटर, नेमणुक तहसिल कार्यालय, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड यांनी तक्रारदार यांना माहे नोव्हेंबर 2025 चे रेशन त्यांचे पॉज मशिनमध्ये अपलोड करण्यासाठी व नवीन 27 लाभार्थ्यांचे रेशन कार्ड ऑनलाईन करण्यासाठी तक्रारदार यांना रेशन दुकानाचे मागील चार महिन्याचे मिळालेले 57000/- कमिशनचे 20 टक्कयाची मागणी करून तडजोडी अंती 10 टक्कयाप्रमाणे 5700/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची संमती दिली.
वेळ 15.40 ते 15.57 वाजण्याचे दरम्यान तहसिल कार्यालय, हदगावचे पुरवठा विभागात तक्रारदार यांचेकडून निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन क-हाळे यांनी 5700/- रूपये लाच स्विकारण्यास सहमती दर्शवून, तक्रारदार यांना ''माझेकडे द्या किंवा गोविंदकडे, एकाच ठिकाणी जाणार आहेत पैसे'' असे म्हणून कंत्राटी गोविंद जाधव यांना तक्रारदार यांच्याकडून लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर तक्रारदार हे पुरवठा विभागातील कंत्राटदार गोविंद जाधव यांच्याकडे जावून मॅडमने तुमच्याकडे मला मिळालेले 57000/- रूपये कमिशनचे 10 टक्के 5700/- रूपये द्यायला सांगितले आहे असे बोलले, तेव्हा गोविंद जाधव यांनी, ''घेतो,..............मापतो थोड, थांबा की पाच मिनिटे,......... तुम्ही जा आता''असे म्हणून अँन्थ्रासिनयुक्त लाचेची रक्कम 5700/- रूपये स्वतःचे ताब्यातील प्रिंटरवर ठेवून घेवून स्वतःसाठी व पुरवठा निरीक्षण अधिकारी सुमन क-हाळे यांच्यासाठी लाच स्विकारली आहे. म्हणून माझी निरीक्षण अधिकारी श्रीमती सुमन संभाजी क-हाळे व संगणक डेटा ऑपरेटर गोविंद अप्पाराव जाधव यांचे विरुध्द कलम 7,7A व 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही



Scanned with CamScanner